# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६३ /२०२४ दि. ०५/०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, डोंबिवली** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. दि. १७/०९/२०२४ रोजी मोठागाव ब्रिजखाली, रेतीबंदर खाडी येथील विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे, मुंबई कडून मानकोली – मोठागाव ब्रिजवरून मोठागाव, डोंबिवली पश्चिम कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत अ) मानकोली भिवंडी हायवे, ब) अंजुर दिवे गाव, क) लोढाधाम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने अंजुर फाटा, रांजणोली, भिवंडी बायपास मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण, अंबरनाथ, बदलापूर व नवी मुंबई कडून मोठागाव ब्रिजवरून मानकोली भिवंडी कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत अ) पत्रीपूल, ब) टाटा नाका, क) सुयोग हॉटेल, ४) DNS बॅंकेजवळ सोनारपाडा, ५) मानपाडा पेट्रोल पंपाजवळ, मानपाडा चौक, ६) घारडा सर्कल, डोंबिवली पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतून दुर्गाडी चौक, कल्याण मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ठाकुर्ली पूर्व व डोंबिवली पूर्व कडून मोठागाव ब्रिजवरून मानकोली भिवंडी कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपर ब्रिज व ठाकुर्ली ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतून दुर्गाडी चौक, कल्याण मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) डोंबिवली पश्चिम कडून मोठागाव ब्रिजवरून मानकोली भिवंडी कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **मोठागाव ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतून दुर्गाडी चौक, कल्याण मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :—**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— सपोआ, कल्याण व भिवंडी वाहतूक विभाग, ठाणे शहर
प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर

CamScanner